दि.२६जून रोजी समोरा-समोर बोलून माझ्या घरापासून

पालकमंत्री संजय राठोड यांकडे लक्ष देतील का याकडे सर्वांचे लक्ष लागला आहे.

फाउंडेशनचे सल्लागार अँड. राजकुमार पवार साहेब , रूपाली खरात मॅडम खडकवासला

व शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी मुलांना मार्गदर्शन केले.

# विज्ञान महाविद्यालयाच्या २० विद्यार्थ्यांची सायबर योद्धा म्हणून क्विक हिल फाउंडेशन कडून निवड

**• बाळकडू : सतिष पवार**
**संपर्क. ९५२७७९९३०४**

**०६ धुळे ग्रामीण (धुळे):–** शिवाजी विद्याप्रसारक संस्थेचे डॉ.पा.रा.घोगरे विज्ञान महाविद्यालय आणि क्विक हील फाउंडेशन पुणे व महाराष्ट्र सायबर विभाग धुळे यांच्यात सामंजस्य करार झालेला आहे. या कराराअंतर्गत पदवी व पदव्युत्तर वर्षातील संगणकशास्त्र विभागातील २० विद्यार्थ्यांची ''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'' या उपक्रमांतर्गत ''सायबर योद्धा'' म्हणून निवड करण्यात आली आहे. हे विद्यार्थी शाळा, महाविद्यालय, नातेवाईक तसेच समाजात सायबर जागरूकता अभियान राबवणार आहेत. निवड प्रक्रियेसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या सी एस आर एक्झिक्यूटिव्ह गायत्री पवार या उपस्थित होत्या. त्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना समजावले की वेगवेगळ्या वयाच्या लोकांमध्ये त्यांच्या वयाचं होऊन कशा पद्धतीने सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून द्यायचे आहे. तसेच''क्विक हील''च्या वेबसाईटवर महाराष्ट्र सायबर चे पेज आहे त्यात वेगवेगळे सायबर फ्रॉड दिलेले आहेत. त्याचा अभ्यास जनमानसात जागृती निर्माण करण्याकरता करा व देशाचे एक जबाबदार नागरिक बना. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम व्ही.पाटील यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की महाराष्ट्राच्या ३० महाविद्यालयांची या उपक्रमात निवड झाली आहे त्यात आपण आहोत म्हणून या संधीचा फायदा घेऊन उपक्रमात सहभागी होऊन धुळेकरांना सायबर सुरक्षित करण्याचे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा.डॉ.स्वाती बोरसे यांनी केले. तसेच संगणकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.राकेश देवरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे तसेच संगणक शास्त्र विभागाच्या सहकारी प्राध्यापक बंधू भगिनींचे सहकार्य लाभले. तसेच विद्यार्थी जयेश गोरे, दिव्येश सोनवणे, पूर्वा पंचारिया, श्रुती विसपुते यांचे सहकार्य लाभले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन तसेच धुळे ग्रामीणचे आमदार कुणाल बाबा पाटील, संस्थेचे सेक्रेटरी मा. भैय्यासाहेब एस. टी. पाटील यांनी कौतुक केले आहे.

